## ठळक बातम्या

- अधिक उत्पादन देणाऱ्या आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ /शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार वचनबद्ध असल्याची प्रधानमंत्र्यांची ग्वाही

- ठाण्यात उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर झालेला हल्ला म्हणजे एकप्रकारची राजकीय अशांतताच असून, एकमेकांमध्येच संघर्ष पाहायला मिळत असल्याची विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची खंत

- लोकसभा निवडणुकीत विरोधकांच्या अपप्रचारामुळे भाजपाच्या जागा घटल्या, पण जनाधार घटला नसल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं मत

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप, मनू भाकर आणि पी. आर. श्रीजेश यांना ध्वजधारकाचा मान

**<><><><><>**

देशातल्या शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे असं, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतल्या कृषी विज्ञान केंद्रात अधिक उत्पादन देणाऱ्या, हवामानाशी जुळवून घेणाऱ्या, आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ झाला. याबद्दल प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरून आपल्या भावना व्यक्त केल्या. या वाणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, असा विश्वासही

त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात व्यक्त केला आहे. २७ फळपिकांसह इतर पिकं मिळून ६१ पिकांसाठी हे वाण विकसीत केले गेले आहेत. त्यात तृणधान्य, भरडधान्य, कडधान्य, तेलबिया, मसाले, ऊस, कपूस यांसह विविध पिकांचा समावेश आहे.

वाणांच्या वाटपाला प्रारंभ केल्यानंतर प्रधानमंत्र्यांनी शेतकरी आणि कृषी वैज्ञानिकांशी संवाद साधला. ही नवी वाणं तयार केल्याबद्दल त्यांनी शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं. नव्यानं विकसित होणाऱ्या वाणांच्या फायद्यांबद्दल कृषी विज्ञान केंद्रांनी शेतकऱ्यांना माहिती द्यावी, अशी सूचना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. लोक आता पोषक आहारावर भर देत असल्याचं सांगून भरड धान्याचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

**<><><><><>**

ठाण्यात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर झालेला हल्ला म्हणजे एकप्रकारची राजकीय अशांतताच असून, अशांत परिस्थिती होऊ नये याची काळजी त्या-त्या पक्षाच्या वरिष्ठांनी घेतली पाहिजे, असं विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटलं आहे. त्या आज नाशिक इथं बातमीदारांशी बोलत होत्या. पक्ष संघटना सोडून गेलेल्यामंध्ये, एकमेकांमध्येच हा संघर्ष सध्या पाहायला मिळत आहे. प्रत्येक निवडणुकीच्या आधी भाषिक जहरीपणा आणला जातो, तो चुकीचा आहे, असं त्या म्हणाल्या.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या प्रचार आणि प्रसारासाठी, तसंच महिला मेळाव्यासाठी त्या नाशिकमध्ये आल्या होत्या. महायुती सरकारमध्ये

आगामी काळात मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदेच राहतील, असा विश्वास गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

विरोधी पक्षातल्या नेत्यावरचा हल्ला म्हणजे महाराष्ट्रात अराजकता माजल्याचे लक्षण आहे, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या वेळी विरोधकांनी अपप्रचार केल्यानं भाजपाच्या जागा कमी आल्या, पण आपला जनाधार कमी झालेला नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज अकोल्यात भाजपाच्या जिल्हा विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत बोलत होते.

कुठल्याच बहिणीला लाडकी बहीण योजनेपासून वंचित ठेवण्यात येणार नाही. मात्र या  योजनेच्या यशाचा त्रास महाविकास आघाडीला होत आहे ते रोज लाडक्या बहिणीच्या संदर्भात खोटं बोलत आहेत असा आरोपही फडणवीस यांनी यावेळी केला. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आपल्या सरकारनं घेतला आहे त्यासाठी आपल्या सरकारनं सौर प्रकल्पामधून १२हजार मेगावॅट वीजनिर्मितीची तयारी केली आहे. पुढची पाच वर्ष शेतकऱ्यांना विजेचं बील येणार नाही असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिले. १ कोटी २० लाख शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पीक विम्याचे पैसे देण्याची सुरुवात आपण केली आहे शेतकऱ्यांचा विचार करणारं हे सरकार आहे असंही ते म्हणाले.

विदर्भाचा दुष्काळ कायमचा संपवणाऱ्या पेनगंगा प्रकल्पालाही सरकारनं मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे १० लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून विदर्भाचा दुष्काळ संपणार आहे. यामुळे विदर्भातल्या पुढच्या पिढीला कोरडवाहू शेती काय असते हे माहित पडणार नाही, अशा प्रकारची व्यवस्था युतीसरकार करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

फिजी, न्यूझीलंड आणि तिमोर लेस्ते या तीन देशांचा दौरा आटोपून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी नवी दिल्लीत परतल्या. या भेटीदरम्यान द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासोबतच महत्त्वाच्या मुद्यांबाबत सामंजस्य करार आणि द्विपक्षीय करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. तिथल्या भारतीय समुदायाशी जोडणं, हाही या भेटीमागचा उद्देश होता.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड--बाईट - मृणाल कुलकर्णी ( २३ सेकंद)**

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत पनवेल महापालिकेनं आज तिरंगा मॅरेथॉनचं आयोजन केलं होतं. विद्यार्थी, नागरिक, महानगरपालिका तसंच सुरक्षा विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि स्वच्छतादूत मोठ्या संख्येनं या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते. पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयापासून सुरू झालेल्या या मॅरेथॉनची वडाळे तलाव इथं सांगता झाली.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा समारोप आज होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता हा समारोपाचा समारंभ सुरू होईल. दोन ऑलिम्पिक पदकं जिंकणारी नेमबाज मनू भाकर आणि हॉकी संघाचा गोलकीपर पी. आर. श्रीजेश या कार्यक्रमात भारताचे ध्वजधारक असतील. समारोपाच्या वेळी ऑलिम्पिक ज्योत समारंभपूर्वक शांत केली जाईल आणि पुढच्या, २०२८ ऑलिम्पिकच्या लॉस अँजेलिस व्यवस्थापन समितीकडे ऑलिम्पिकचा ध्वज सुपूर्द केला जाईल. सध्याच्या

पदकतालिकेत भारत एक रौप्य आणि पाच कास्यपदकांसह ७१व्या स्थानावर आहे. चीन पहिल्या, अमेरिका दुसऱ्या, तर ऑस्ट्रेलिया तिसऱ्या स्थानावर आहे.

दरम्यान, भारतासाठी पहिलंवहिलं वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारा नेमबाज अभिनव बिंद्रा याला काल आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या कार्यक्रमात प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट हिला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाविरोधात तिनं दाखल केलेल्या याचिकेवर निकाल द्यायला ऑलिम्पिक क्रीडा लवादचा निकाल १३ ऑगस्ट रोजी येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीला काँग्रेस - महाविकास आघाडी एकत्र सामोरे जाणार आहेत, असं काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटलं आहे. ते आज नांदेडमध्ये बातमीदारांशी बोलत होते. विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रदेश काँग्रेसच्यावतीनं आज नांदेडमध्ये बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत चेन्नीथला बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

माजी परराष्ट्र मंत्री के. नटवर सिंग यांचं काल रात्री दिल्लीजवळच्या गुरुग्राममध्ये दीर्घ आजारानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. काही काळ त्यांची तब्येत बरी नव्हती. नटवर सिंह यांचा जन्म १९३१ मध्ये राजस्थानच्या भरतपूर जिल्ह्यात झाला. १९८४ मध्ये त्यांना पद्मभूषण

पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. नटवर सिंग यांनी अनेक पुस्तकंही लिहिली आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांचा मोबाईल हॅक झाला असून त्यामधील व्हाट्सअपसुद्धा हॅक झालं आहे. त्यामुळं आपल्याला कोणीही थेट फोन किंवा संदेश पाठवू नये, असं आवाहन खासदार सुळे यांनी आपल्या एक्स खात्यावरून केलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य-महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल, अशी शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. आकाश सामान्यत: ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडतील, असा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**